प्रकल्प प्रवर्तक मे. जवाहरलाल नेहरू पत्तन प्राधिकरण (JNPA) द्वारा गारगांव दगडखाण प्रकल्प, गट क्र. ८२ (भाग), भाडेंपट्टा क्षेत्र १७.०८ हे. मौजे गारगांव, ता.जि. पालघर, खाणकाम क्षेत्र-१७.०८ हे., खाणकाम/उत्पादन ३६०८७६४ मे. टन/वर्ष येथे प्रस्तावित प्रकल्पासाठी पर्यारणविषयक जाहिर जनसुनावणीचे **इतिवृत्त....**

दिनांक : ०२.०८.२०२६

वेळ : दुपारी ०१:३० वाजता

स्थळ : जीवन शिक्षण संस्थेचे अनुदानीत प्राथमिक व माध्यमिक शाळेचे खुले मैदान, शिगांव (खुताड), बोईसर- शिगांव रोड, ता.जि. पालघर

**प्रस्तावना:-**

मे. जवाहरलाल नेहरू पोर्ट ऑथोरिटी (जेएनपीए) हे महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने वाढवण, ता. डहाणू, जि. पालघर येथे बंदर विकसित करीत आहेत. या प्रकल्पाच्या उभारणीसाठी व बांधकामासाठी लागणारे दगड/खडक उत्खन्ननासाठी "गारगांव दगडखाण प्रकल्प, गट क्र. ८२ (भाग), भाडेपट्टा क्षेत्र १७.०८ हे. मौजे गारगांव, ता.जि. पालघर खाणकाम क्षेत्र-१७.०८ हे., खाणकाम/उत्पादन ३६०८७६४ मे. टन/वर्ष" प्रस्तावामध्ये नमुद केल्याप्रमाणे या प्रकल्पाबाबत प्रकल्पधारकाने पर्यावरण मंजूरीकरिता पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, मुंबई यांना अर्ज सादर केल्यानंतर, भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल, मंत्रालय यांनी महाराष्ट्र राज्यासाठी गठित केलेल्या राज्यस्तरीय तज्ञ मुल्यांकन समिती (SEAC-१) यांनी TO२६B०१०८MH५३४१४५१N नुसार दि. २५.०४.२०२६ रोजी संदर्भ अटी (TOR) मंजूर केला (सोबत सहपत्र-१ प्रमाणे जोडण्यात येत आहे) व त्यानुसार भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल, मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दि. १४.०९.२००६ च्या पर्यावरण आघात मुल्यांकन अधिनियमांन्वये व ०१.१२.२००९ च्या सुधारीत अधिनियमांच्या तरतुदीप्रमाणे पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालासोबत जाहीर जनसुनावणी घेऊन जनसुनावणीमध्ये उपस्थित झालेले मुद्दे व त्याबाबत प्रकल्पधारकाने दिलेली उत्तरे यांचा सामावेश करून नवीन पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल सादर करण्याचे निर्देश आहेत.

प्रकल्प व्यवस्थापनाने पर्यावरण विषयक जनसुनावणीसाठी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडे उपरोक्त प्रकल्पाकरीता अर्ज केल्यावर मप्रनि मंडळ व जिल्हाधिकारी, पालघर यांच्या समन्वयाने दि. ०२.०८.२०२६ रोजी दुपारी ०१:३० वाजता जीवन शिक्षण संस्थेचे अनुदानीत प्राथमिक व माध्यमिक शाळेचे खुले मैदान, शिगांव (खुताड), बोईसर- शिगांव रोड, ता.जि. पालघर येथे मे. जवाहरलाल नेहरू पत्तन प्राधिकरण (JNPA) द्वारा जिल्हा पालघर येथे प्रस्तावित गारगांव दगडखाण प्रकल्प, गट क्र. ८२ (भाग), भाडेपट्टा क्षेत्र १७.०८ हे. मौजे गारगांव, ता.जि. पालघर बाबत पर्यावरण विषयक जनसुनावणी आयोजीत करण्याची सूचना सदर जनसुनावणीची जाहिरात एक महिन्या अगोदर दि. ०१.०७.२०२६ रोजी द इंडियन एक्सप्रेस इंग्रजी दैनिकामध्ये व दै. लोकमत, पुण्यनगरी व दै. सकाळ या मराठी दैनिकांमध्ये प्रसिध्द करण्यात आलेली होती (सोबत सहपत्र-२ प्रमाणे जोडण्यात येत आहे). तसेच सदर प्रकल्पाची माहिती असलेल्या कार्यकारी सारांशाच्या प्रती म.प्र.नि. मंडळाच्या http://www.mpcb.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द

केले होते. पर्यावरण आघात मुल्यांकन अधिनियम २००६ मध्ये नमुद केलेल्या तरतुदी प्रमाणे वृत्तपत्रातील जाहीर सुचनेच्या जाहिरातीद्वारे सर्व संबंधित व्यक्तींना त्यांच्या उक्त प्रकल्पाविषयी सुचना, टीकाटिप्पणी, विचार, आक्षेप इत्यादी संबंधित नियामक प्राधिकरण येथे नोंदविण्याबाबत आवाहन करण्यात आले होते.

सदर प्रकल्पाची माहिती असलेली पर्यावरण आघात मुल्यांकन प्रारूप अहवालाची इंग्रजी व मराठी मधील एक प्रत आणि कार्यकारी सारांशाची मराठी व इंग्रजी मधील एक प्रत खालील कार्यालयात नागरीकांच्या अवलोकनाकरीता/ संबंधितांच्या अभ्यासासाठी उपलब्ध करून देण्यात आली.

१. मा. जिल्हाधिकारी, जिल्हादंडाधिकारी तथा दंडाधिकारी कार्यालय, ता.जि.पालघर
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पालघर, पालघर बोईसर रोड, कोळगांव, ता.जि. पालघर
३. पर्यावरण वने आणि हवामान बदल मंत्रालय, झोनल कार्यालय, पश्चिम मध्य झोन, नवीन सेक्रेटरी ईमारत, तळ मजळा, पुर्व विंग,सिव्हील लाईन, नागपूर-४४०००१
४. संचालक, पर्यावरण आणि वातावरणीय बदल विभाग नवीन प्रशासन भवन, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय,मुंबई-४०० ०३२.
५. उप-विभागीय दंडाधिकारी पालघर पालघर बोईसर रोड, कोळगांव, ता.जि. पालघर
६. मुख्य प्रबंधक,जिल्हा उद्योग केंद्र, मध्यवर्ती कार्यालय,जि. पालघर
७. सह-संचालक (जल प्रदूषण नियंत्रण), महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरु पाईंट, २ रा व ४ था माळा, सिनेप्लानेट सिनेमा समोर, सायन सर्कल जवळ (पु) मुंबई - ४०० ०२२
८. प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, ५ वा मजेला, ऑफिस कॉम्प्लेक्स बिल्डींग, मुलुंड चेकनाक्याजवळ, वागळे इस्टेट, ठाणे-४०० ६०४.
९. प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, ३ रा मजला, ऑफिस कॉम्प्लेक्स बिल्डींग, मुलुंड चेकनाक्याजवळ, वागळे इस्टेट, ठाणे-४०० ६०४.
१०. तहसिलदार, तहसिलदार कार्यालय, पंचायत समिती, कचेरी रोड, ता. पालघर, जि. पालघर
११. गट विकास अधिकारी, पंचायत समिती,कचेरी रोड, ता. पालघर, जि. पालघर
१२. ग्राम विकास अधिकारी, ग्रुप ग्रामपंचायत खानिवडे- गारगांव, तालुका व जिल्हा पालघर
१३. ग्राम विकास अधिकारी, ग्रुप ग्रामपंचायत रावते, तालुका व जिल्हा पालघर
१४. ग्राम विकास अधिकारी, ग्रुप ग्रामपंचायत शिगांव- सुमडी, तालुका व जिल्हा पालघर
१५. ग्राम विकास अधिकारी, ग्रुप ग्रामपंचायत महागांव- वाळवे, तालुका व जिल्हा पालघर
१६. ग्राम विकास अधिकारी, ग्रुप ग्रामपंचायत चिंचारे, तालुका व जिल्हा पालघर

सदर प्रस्तावित प्रकल्पाचा अहवाल जनतेच्या माहितीकरीता आपल्या कार्यालयाच्या दर्शनी भागात लावण्यात यावा व जनसुनावणी बाबत आपल्या कार्यालयामार्फत सुध्दा व्यापक प्रसिध्दी देण्याबाबत कळविण्यात आले होते. तसेच म. प्र. नि. मंडळाकडुन संबंधित गावांमध्ये दर्शनी भागावर जनसुनावणीबाबतचे बॅनर लावण्यात आले होते. अशा तऱ्हेने जाहीर जनसुनावणी बाबत अधिसूचनेमध्ये नमुद केलेल्या पध्दतीचा अवलंब करुन व्यापक स्वरूपात प्रसिध्दी देण्यात आली जेणेकरुन प्रकल्प बाधित

अथवा संबंधित व्यक्तीना त्यांचे आक्षेप, टिका टिप्पणी, विचार अथवा सुचना संबंधित नियामक प्राधिकरणास नोंदविणे सोईचे होईल.

जनसुनावणीचे स्थळ, जीवन शिक्षण संस्थेचे अनुदानीत प्राथमिक व माध्यमिक शाळेचे खुले मैदान, शिगांव (खुताड), बोईसर- शिगांव रोड, ता.जि. पालघर निवडण्यात आले कारण हे स्थळ प्रकल्पाजवळचे असुन संबंधितांना सोईस्कर असल्याने या ठिकाणी जनसुनावणी ठेवण्यात आली.

मे. जवाहरलाल नेहरू पत्तन प्राधिकरण (JNPA) यांनी म.प्र.नि.मंडळाच्या समन्वयाने सर्व प्रकल्प बाधित नागरीकांकरीता या जनसुनावणी करीता उपस्थित राहणे व जनसुनावणी संपल्या नंतर त्यांना आपआपल्या गावी पोहचण्यासाठी वाहतुक व्यवस्थेची सोय करण्यात आली होती.

पर्यावरण वने व हवामान बदल (MoEF & CC) मंत्रालय, भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल, मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दि. १४.०९.२००६ च्या पर्यावरण आघात मुल्यांकन अधिनियमांन्वये व ०१.१२.२००९ अधिसूचने नुसार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सदर जाहीर जनसुनावणी घेण्यासाठी दि. ०५.०७.२०२६ रोजीच्या आदेशान्वये खालीलप्रमाणे समिती गठीत केली.

१) श्री. तेजस चव्हाण - अध्यक्ष
उपजिल्हाधिकारी तथा दंडाधिकारी, पालघर

२) श्री. किरण हसबनीस - सदस्य
प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, ठाणे

३) श्री. राजू वसावे - समन्वयक
उप प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, तारापूर-२

सदर प्रकल्पाबात प्राप्त झालेल्या तक्रारी, आक्षेप, निवेदने व जनसुनावणी दरम्यान एकूण उपस्थितांचे हजेरीपट तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सदर जाहीर जनसुनावणी घेण्यासाठी गठीत केलेल्या समितीचा आदेश अनुक्रमे सहपत्र-३,४ व ५ प्रमाणे जोडण्यात येत आहे.

**जनसुनावणीचे इतिवृत्तः-**

सकाळी १०:०० वाजता नियोजीत असलेली गारगांव दगडखाण प्रकल्प, गट क्र. ८२ (भाग), भाडेपट्टा क्षेत्र २४.९४ हे. मौजे गारगांव, ता.जि. पालघर बाबतची जनसुनावणी दुपारी १२:३५ वाजता सुरू करून ती १:३० वाजता समाप्त करण्यात आली. जनसुनावणी समितीचे समन्वयक श्री. राजू वसावे, उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, तारापूर-२ यांनी मंचावरून या पुढील प्रस्तावित जनसुनावणीची कार्यवाही २:३० वाजता सुरू करण्यात येईल असे जाहीर केले.

जीवन शिक्षण संस्थेचे अनुदानीत प्राथमिक व माध्यमिक शाळेचे खुले मैदान, शिगांव (खुताड), बोईसर- शिगांव रोड, ता. जि. पालघर येथे म.प्र.नि. मंडळद्वारे सभा मंडपाची उभारणी करून जनसुनावणी

आयोजीत करण्यात आली होती. सुरक्षेच्या दृष्टीकोनातून सुरक्षा तपासणी करून मंडपात येणाऱ्या नागरीकांचे हजेरीपटावर स्वाक्षरी करून सभा मंडपात केलेल्या बैठक व्यवस्थेत बसण्याची व्यवस्था केलेली होती. त्यानुसार पहिल्या जनसुनावणीच्या नियोजीत वेळीच एकूण ९० संबंधित नागरीकांनी सदर जनसुनावणीच्या हजेरीपटावर स्वाक्षरी करून सभा मंडपात आसन ग्रहन केलेले होते.

पहिल्या जनसुनावणीची कार्यवाही सुरू करण्याअगोदरच जनसुनावणीकरीता उपस्थित काही जनसमुदायाकडून सदर प्रकल्पांची माहिती असलेली पर्यावरण आघात मुल्यांकन प्रारूप अहवालांची इंग्रजी व मराठी मधील एक प्रत आणि कार्यकारी सारांशाची मराठी व इंग्रजी मधील एक प्रत आमच्या ग्रामपंचायतीकडे ३० दिवसा अगोदर मिळालेली नाही असा आक्षेप नोंदविला होता. सदर जनसुनावणी ही पुढे ढकलण्यात यावी, याबाबत आम्ही उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, तारापूर-२ यांच्या कार्यालयात लेखी निवेदने दिलेले आहेत. या जनसुनावणीसाठी अजून लोक येत आहेत ते येईपर्यंत जनसुनावणीची कार्यवाही सुरू करण्यात येऊ नये अशी विनंती केली होती. अतिवृष्टीमुळे घरांचे व भातशेतीचे झालेले नुकसान, पिक लावणीची कामे इ. असे प्रश्न करत तिव्र विरोध करून जनसुनावणीची कार्यवाही सुरू करण्यास मज्जाव केला. घोषणाबाजी नंतर मंडपात बसलेले काही उपस्थित नागरीक हे जनसुनावणीच्या मंडपातून बाहेर निघून गेले होते. मंडपातून बाहेर गेलेले नागरीक व मंडपाच्या प्रवेशद्वाराजवळ जमलेल्या जनसमुदायाकडून जनसुनावणी पुढे ढकला अशा घोषणाबाजी सुरूच ठेऊन मंडपात आलेच नाही.

जनसुनावणी समितीचे समन्वयक श्री. राजू वसावे, उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, तारापूर-२ यांनी मंचावरून मंडपा समोरील उपस्थित जनसमुदायास मंडपामध्ये आसन ग्रहन करून आपले सर्व मुद्दे सनदशिरपणे मांडावे असे आवाहन केले. तसचे मुद्दयांवर प्रकल्प धारकाकडून समाधानकारक उत्तर/आश्वासन दिले जाईल, तसेच प्रकल्पधारक व या प्रकल्पामुळे बाधित जनसमुदायामध्ये चर्चा घडवून आणण्यासाठी ही जनसुनावणी असल्याचे म.प्र.नि. मंडळामार्फत पुन:श्च सांगण्यात आले, तसेच प्रकल्पधारकाने तयार केलेला प्रारुप पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालावर अभ्यास करून आपले आक्षेप, टिका टिप्पणी, विचार अथवा सुचना, निवेदने सादर करण्याबाबत उपस्थित नागरीकांना वारंवार विनंती करण्यात आली. तथापि, मंडपाच्या बाहेर जमलेल्या जनसमुदायाने मंडपामध्ये प्रवेश न करता मंडपाच्या बाहेरच घोषणाबाजी करण्यात आली.

उप जिल्हाधिकारी तथा जन सुनावणी समितीचे मा. अध्यक्ष यांनी देखील मंडपाच्या बाहेर जमलेल्या जनसमुदायाने मंडपामध्ये यावे व त्यांचे जे काही म्हणणे असेल ते सनदशिर मार्गाने मांडावेत असे मंचावरून वारंवार आवाहन केले. मात्र मंडपाच्या बाहेर जमलेल्या जनसमुदायाने मंडपामध्ये प्रवेश न करता मंडपाच्या बाहेरच घोषणाबाजी सुरूच ठेवली.

भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल, मंत्रालय यांचे पत्र क्र. जे-१५०१२/२९/२०१०-IA/II (M), दि. १९.०४.२०१० नुसार प्रसारीत ऑफीस मेमोरेंडम मधील मार्गदर्शक सुचनेनूसार पुरेसा कालावधीच्या अंतरानंतर प्रस्तावित दुपारी ०१:३० वाजता नियोजीत जनसुनावणीची कार्यवाही ०३:०० वाजता सुरू करण्यात आली.

जनसुनावणीच्या सुरुवातीस श्री. राजू वसावे, उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, तारापूर-२ यांनी अध्यक्ष व उपस्थित अभ्यगतांचे स्वागत करुन जनसुनावणीच्या कार्यपध्दतीबद्दल माहीती दिली. त्यांनी उपस्थितांना या प्रकल्पाच्या अनुषंगीक पर्यावरण विषयक, सुचना, विचार, आक्षेप इत्यादी घेऊन पुढे यावे अशी विनंती केली. तसेच त्यांनी हि सुनावणी सर्व संबंधित लोकांसाठी आयोजीत केलेली आहे जेणेकरुन त्यांचे पर्यावरण विषयक प्रश्न/शंकाचे निरसन करण्यात येईल. तद्नंतर त्यांनी जनसुनावणी समितीचे अध्यक्ष यांना जनसुनावणीची कार्यवाही सुरु करण्याबाबत विनंती केली.

जनसुनावणी समितीचे मा. अध्यक्ष तथा उपजिल्हाधिकारी, पालघर यांनी उपस्थित जनसमुदायास मे. जवाहरलाल नेहरू पत्तन प्राधिकरण (JNPA) द्वारा जिल्हा पालघर येथे प्रस्तावित द्वारा द्वारा गारगांव दगडखाण प्रकल्प, गट क्र. ८२(भाग), भाडेपट्टा क्षेत्र १७.०८हे. मौजे गारगांव, ता.जि. पालघर (खाणकाम क्षेत्र-१७.०८ हे., खाणकाम/उत्पादन ३६०८७६४ मे.टन/वर्ष) या प्रस्तावाबाबत आपल्या सुचना, विचार,आक्षेप घेऊन पुढे यावे अथवा त्या लेखी स्वरुपात मांडाव्यात, आपण व्यक्त केलेले मत तसेच सुचना व आक्षेप या अधिसूचनेत नमुद केलेल्या तरतुदीप्रमाणे पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, मुंबई यांना कळविण्यात येतील, सदर सुनावणीचे छायाचित्रीकरण व व्हिडीओ शुटींग म.प्र.नि.मंडळाकडुन कायद्यातील तरतुदी प्रमाणे करण्यात येत आहे, तरी प्रत्येकाने आपले प्रश्न शांतपणे व सनदशिर मार्गाने उपस्थित करावेत व जन सुनावणी शांतपणे पार पाडण्यात सहकार्य करावे असे आवाहन केले. तसेच प्रत्येकाने आपले प्रश्न विचारण्यापुर्वी आपले नाव व पत्ता सांगावा जेणे करुन सुनावणीच्या इतिवृत्तांत तयार करताना ते नमुद करण्यात येतील. त्यानंतर मा. अध्यक्ष यांनी प्रकल्प प्रवर्तकांना प्रस्तावित प्रकल्पाबाबतची माहीती उपस्थितांना देण्यात यावी तसेच त्यांनी प्रकल्पाबाबत उपस्थित केलेल्या प्रश्नांचे शंकानिरसन करावे अशा सुचना दिल्या.

तद्नंतर प्रकल्पधारकाच्या वतीने श्रीमती मानसी महाबळ, पर्यावरण सल्लागार यांनी सदर प्रस्तावित प्रकल्पांबाबत पर्यावरण विषयक केलेला अहवाल मराठी भाषेत सादर केला. सादरीकरणात प्रामुख्याने प्रकल्पाबाबत खालील बाबी स्पष्ट करण्यात आल्या.

- प्रस्तावना, प्रकल्पाबाबतची सविस्तर माहीती, प्रकल्पाचे विश्लेषण, सारांश, निष्कर्ष.
- पर्यायांचे विश्लेषण.
- वैधानिक परवानग्या व मंजुरीची स्थिती.
- प्रकल्पाचे क्षेत्रफळ, सिमा, अक्षाश-रेखांश, नकाशा इ.
- पर्यावरणीय आधारभूत स्थिती (सद्यः स्थिती), भूशास्त्रीय अभ्यास, भूशास्त्रीय साठा आणि आच्छादनासह वर्षनिहाय उत्पादन.
- हरित पट्टा, वृक्ष लागवडीचा तपशील, नुकसान भरपाई वृक्ष लागवडीचा तपशील
- जलभूशास्त्रीय अभ्यास, नियोजीत प्रकल्पांमुळे हवा,पाणी,विस्थापन,जैवविविधता यावर होणारे परिणाम व्यवस्थापन.
- प्रकल्प चालु झाल्यानंतर केले जाणारे पर्यावरण व्यवस्थापन आराखडा याबाबतची माहीती.
- खाणबंद करण्याचा आराखडा व इतर पर्यावरण व्यवस्थापन विषयीची माहीती.

प्रकल्पधारकाने पर्यावरण विषयीची सविस्तर माहीती दिल्यानंतर जनसुनावणी समितीचे मा. अध्यक्ष यांनी असे आवाहन केले की, यानंतर आक्षेप/सुचना/प्रश्न व उत्तरे घेतले जातील. आपणांस विनंती की, सदर प्रकल्पाच्या पर्यावरण विषयक प्रश्न विचारावेत व त्यांचे समर्पक उत्तर प्रकल्प धारकाने द्यावे.

**जनसुनावणी दरम्यान चर्चेतील प्रश्न, टीका, टिप्पण्या, आक्षेप, सुचना तसेच प्रकल्प धारकाने दिलेली उत्तरे/आश्वासने खालील प्रमाणे:**

१. श्री. सुनिल सावंत :-

| अ. क्र. | आक्षेप /सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरून प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| (१) | १. मी निसर्गाशी जुडलेला माणूस, निसर्गाला वाचविणे आपल काम आहे, हा प्रकल्प का हवा आहे हेच मला कळत नाही याच्यामुळे डोंगर हळूहळू नष्ट होतील.<br>२. डोंगर जर निर्माण करू शकत असला तरच काम करा.<br>३. डोंगर नाही राहिले, तर नदीला पाणी मिळणारच नाही.<br>४. वाढत्या लोकसंख्येमुळे Natural Resorce वर ताण वाढत चालला आहे.<br>५. डोंगर जर निर्माण करू शकत असाल तरच काम करा अन्यथा नाही, निसर्गाला त्रास देणे हे सर्वात मोठे पाप आहे.<br>६. प्रत्येकाने काम केले पाहिजे निसर्गासाठी, लोकांच्या जमिनी म्हणजे त्यांचे अस्तित्त्व.<br>७. सरकार फक्त रोजगाराची आश्वासने देतात प्रत्यक्षात ते पूर्ण करत नाही.<br>८. निसर्ग वाचवा, निसर्ग वाचला तर लोक वाचतील आणि लोकं वाचले तर रोजगार, पण तुम्ही लोकांचे अस्तित्व या प्रकल्पामुळे लोकांचे आयुष्य उध्वस्त केले जाईल.<br>९. तुम्ही त्याचे अस्तित्त्व निर्माण करू शकत असाल तर हा प्रकल्प करा.<br>१०. तुम्ही लोकांचे अस्तित्त्व निर्माण करू शकाल का?<br>११. तोडलेले डोंगर जसे च्या तसे पूर्ववत करता येईल का ?<br>१२. पर्यावरणाचा अभ्यास नसेलतर पर्यावरणाशी छेडछाड करण्याचा अधिकार कोणी दिला?<br>१३. जर सरकार हे सर्व पून्हा बनवू शकत नाही तर ते नष्ट करण्याचा अधिकार सरकारला कोणी दिला?<br>१४. प्रकल्प कसा रद्द करता येईल त्याच्यावर सगळ्यांनी काम केले पाहिजे. | प्रकल्प धारकाने असे स्पष्ट केले कि, आपल्या सर्व मुद्दयांची नोंद घेण्यात आली असून त्याचा खुलासा अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात करण्यात येईल. |

२. श्री. शिवराज पाटील, मुंबई:-

| अ. क्र. | आक्षेप /सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरून प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| (१) | या प्रकल्पात जी शेती आहे त्याच्यावर काय परिणाम होईल का? त्याच्यावर तुम्ही काय बाजु मांडणार? | प्रकल्प धारकाने असे स्पष्ट केले कि, शेती क्षेत्रावर कोणताही परिणाम होणार नाही. |

३. श्री. सागर सैंदाणे, निसर्गप्रेमी, रा. जळगाव

| [[अ. क्र. | आक्षेप /सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरून प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| (१) | १. आज जे इथे खाणकाम करणार आहेत त्याच्या बदल्यात आपण परभणीला झाडे लावणार आहात त्याचा इथे काय फायदा होईल?<br>२. पालघर मध्ये किती झाडे लावण्यात येतील? | प्रकल्पधारकाने असे स्पष्ट केले कि, आपण जी चिंता व्यक्त केली त्याची नोंद घेतलेली आहे. |

श्री. सागर सैंदाणे, निसर्गप्रेमी, रा. जळगाव यांनी प्रश्नाचे उत्तर मिळण्याबाबत मागणी केल्यानंतर मा. उप जिल्हाधिकारी तथा जनसुनावणीचे समितीचे अध्यक्ष यांनी असे स्पष्ट केले कि, आपल्या प्रश्नांची उत्तरे सादरीकरणामध्ये नमुद केल्याप्रमाणे आहेत. प्रकल्पधारक १७८० वृक्षांची लागवड करणार आहोत. त्याच्यामध्ये विविध प्रकारच्या प्रजातीचे वृक्ष असून खाणकामामुळे जे प्रदूषण / धुळ निर्माण होईल ते आजुबाजूला पसरू नये म्हणून हा हरितपट्टा निर्माण केला जाणार आहे.

४. श्री. सुनंदा रेड्डी, पर्यावरणवादी:-

| अ. क्र. | आक्षेप /सूचना/प्रश्न |
|---|---|
| (१) | १. शुन्य टक्के प्रदूषण महत्त्वाचे आहे.<br>२. पर्यावरणाचा ऱ्हास कसा कमी करता येईल ते पहावे. |

पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी समितीचे समन्वयक यांनी उपस्थित असलेल्या नागरीकांना आणखी काही प्रश्न/आक्षेप/सूचना असतील तर ते विचारण्याचे आवाहन केले. तथापि, उपस्थित जनसमुदायामधून इतर कोणीही सुचना/आक्षेप नोंदविण्यासाठी पुढे आले नाहीत.

तद्नंतर मा. उप जिल्हाधिकारी तथा जनसुनावणी समितीचे अध्यक्ष यांनी आता कोणाला आपला प्रश्न अथवा आक्षेप नोंदवायचा नसेल तर आता या जनसुनावणीचा समारोप करण्यास हरकत नाही असे जाहीर केले. संबंधित नागरींकाकडून आपली निवेदने/ प्रकल्पास आक्षेप/सुचना/प्रकल्पास पाठिंबा यादी करून इतिवृत्तामध्ये नोंद घेण्यात येईल असे जाहीर करून जनसुनावणीचा समारोप करताना जनसुनावणीतील उपस्थित झालेल्याबाबींचा आढावा घेऊन उपस्थितांचे आभार मानून दुपारी ठिक ०४:०० वाजता जाहीर जनसुनावणी संपल्याचे जाहीर केले.

तसेच पर्यावरण जाहीर जनसुनावणी समितीचे अध्यक्ष यांनी या जनसुनावणीच्या बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, आक्षेपांची नोंद घेण्यात आली असून त्याचे इतिवृत्त व रेकॉर्डींग जनतेकरिता उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि. मंडळ, तारापूर-२, एम.आय.डि.सी. कॉलनी परिसर, ता. जि. पालघर व म.प्र.नि.मंडळाचे अधिकृत संकेत स्थळ http://www.mpcb.gov.in येथे थोड्या दिवसात उपलब्ध करून देण्यात येईल असे देखील जाहीर केले.

| | | |
|---|---|---|
| (श्री. राजू वसावे)<br>समन्वयक,<br>पर्यावरण विषयक जाहिर<br>जनसुनावणी समिती तथा<br>उप प्रादेशिक अधिकारी,<br>मप्रनि मंडळ, तारापूर-२ | (श्री. किरण हसबनीस)<br>सदस्य,<br>पर्यावरण विषयक जाहिर<br>जनसुनावणी समिती<br>तथा प्रादेशिक अधिकारी,<br>मप्रनि मंडळ, ठाणे | (श्री. तेजस चव्हाण)<br>मा. अध्यक्ष,<br>पर्यावरण विषयक जाहिर<br>जनसुनावणी समिती<br>तथा उप जिल्हाधिकारी तथा<br>दंडाधिकारी, पालघर |